# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७/ 2225 दि. 14/8/17

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः आधार क्रमांकाशी मोबाईल क्रमांक/ई-मेल आयडी व बँक खाते संलग्न करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन संदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती तसेच सवलतींकरीता विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी **www.mahadbt.gov.in** ही वेबसाईटवर सुरु केली आहे. सदर पोर्टलवर विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी त्यांचेकडे आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक असणे जितके आवश्यक आहे. तितकेच त्यांच्या आधार माहितीशी त्यांचा वैयक्तिक मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी व त्यांचे बँक खाते संलग्न असणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थ्यांना अर्ज करतांना त्यांच्या नोंदणीकृत / अधिकृत मोबाईल क्रमांकावर / ई-मेल आयडीवर **MahaDBT** पोर्टलव्दारे ओ.टी.पी. क्रमांक प्राप्त होणार असून त्या क्रमांकाच्या आधारेच त्याला अर्ज करता येणार आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांची आधार नोंदणीही झालेली नाही अशा विद्यार्थ्यांकरीता तात्पुरती सोय म्हणून त्यांनाही अर्ज करता येणार आहे. परंतू ती सोय अत्यंत तात्पुरती असल्याने या वेबसाईटवर शिष्यवृत्ती / सवलतीकरीता अर्ज करतांनाच आधार नोंदणीसाठी आवश्यक असलेली माहिती पोर्टलव्दारे भरुन घेऊन आधार नोंदणी करीता Appointment घेण्याची सोयही उपलब्ध करुन दिलेली आहे. कारण आधार नोंदणी नसल्याने कोणी विद्यार्थी सदर लाभापासून वंचित राहू नये हा शासनाचा मानस आहे. परंतू सदर पोर्टल हे मंजूर झालेले लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यासाठीच तयार करण्यात आले असल्याने मंजूर झालेले लाभ लाभार्थ्याला अन्य कोणत्याही मार्गाने मिळणार नाहीत. त्यामुळे जर एखाद्या आधार नोंदणी नसलेल्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती / सवलत मंजूर झालीच तरी जोपर्यंत तो लाभार्थी सदर पोर्टलवर त्याच्या आधार क्रमांकाची माहिती अद्ययावत करत नाही तोपर्यंत मंजूर रक्कम त्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा होणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरबाबत आपण आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना आधार नोंदणीचे महत्व पटवून देऊन सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करुन घेणे व त्यांना आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य करण्याबाबत प्रस्तूत कार्यालयाच्या मागील अनेक पत्रे / परिपत्रकांव्दारे सूचित केलेले आहेच. तरी सदरबाबत आपले स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी.

RBhosle

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत:

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
३. मा. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई